# कृषी व सहकार क्षेत्रात व्यवसायाभिमुख रोजगार निर्मितीसाठी
# “प्रशिक्षण कार्यक्रम”

**<u>दूरदृष्टी (Vision) :</u>**

- गुणवत्तापूर्वक काम व सर्वोत्कृष्ट सेवा
- नाविन्यपूर्ण शिक्षणाच्या माध्यमातुन समाज परिवर्तन

**<u>ध्येय (Mission) :</u>**

- वैयक्तिक,समुह आधारित संस्थांच्या विकासासाठी दर्जेदार प्रशिक्षणाची संरचना.
- शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मूल्यवर्धन व उत्पन्नाचे स्त्रोत वाढवणे.
- ग्रामीण भागात उद्यमशीलता व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करणे.
- सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, बचत गट यांचे बळकटीकरण व रोजगार निर्मिती.
- सहकारी प्रक्रिया उद्योगांसाठी योजना, वित्त पुरवठा व निर्यात वृद्धीबाबत मार्गदर्शन.

## माहिती व सहभागी संस्था -

देशामध्ये विसाव्या शतकात कृषी उत्पादनामध्ये मोठी क्रांती झालेली होती. परंतु एकविसाव्या शतकामध्ये कृषी मालाचे मूल्यवर्धन करणे, कृषी प्रक्रिया उद्योगात वृद्धी करणे व कृषी मालाची विपणन साखळी निर्माण करण्याची गरज ओळखून महामंडळामार्फत जानेवारी 2019 मध्ये स्वतंत्र प्रशिक्षण विभागाची स्थापना करण्यात आली.

या विभागामार्फत सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, महिला बचत गट, प्रक्रिया उद्योग, उच्च तंत्रज्ञानावर आधारीत शेती अशा अनेक विषयाशी निगडीत 250 पेक्षा जास्त प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करून मागील पाच वर्षात 15,000 शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात आलेले आहे. या कामासाठी महामंडळासोबत खालीलप्रमाणे संस्था सहभागी झालेल्या आहेत.

- नाबार्ड, पुणे
- पोकरा, मुंबई
- आत्मा, कृषी विभाग
- जलजीवन मिशन, मध्यप्रदेश, भोपाल
- मॅग्नेट, पुणे
- राष्ट्रीय मधमाशी मंडळ, दिल्ली
- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)
- भूजल विकास यंत्रणा, पुणे
- सारथी, पुणे
- काटेकोर शेती विकास केंद्र, म.फु.कृ.वि. राहुरी
- बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, बुलढाणा
- कृषी निर्यात, सेंद्रिय शेती, बियाणे बाबत तीन बहुराष्ट्रीय सहकारी संस्था
- मॅनेज हैदराबाद
- 135 पेक्षा जास्त स्वयंसेवी संस्था

वरील संस्थांसाठी तीन ते पाच दिवसाचे निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहेत.

## प्रशिक्षणाचा उद्देश :

- शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मूल्यवर्धन व उत्पन्नाचे स्त्रोत वाढवणे.

- ग्रामीण भागात उद्यमशीलता व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण करणे.
- सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, बचत गट यांचे आर्थिक बळकटीकरण व रोजगार निर्मिती करणे.
- कृषी प्रक्रिया उद्योगांना कर्ज व गुंतवणुकीच्या स्वरुपात वित्त पुरवठ्याबाबत मार्गदर्शन करणे, कृषी मालाची निर्यात वृद्धी करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

शेडनेट व पॉलिहाऊस , नर्सरी तंत्रज्ञान, कमर्शियल हायड्रोपोनिक्स फार्मिंग, हळद, आले उत्पादन तंत्रज्ञान, आधुनिक दुग्ध व्यवसाय, शेतकरी उत्पादक कंपनी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, आत्मनिर्भर भारतासाठी ॲग्री बिझनेस स्टार्टअप, कृषी पर्यटन व ग्रामीण भागातील शेतीला सक्षम जोड व्यवसाय, मत्स्यपालन, फळे व भाजीपाला उत्पादनाची आदर्श कृषी पद्धती, कृषी उत्पादनाचे काढणी पश्चात तंत्रज्ञान, काटेकोर शेती, फळे व भाजीपाल्याचे निर्जलीकरण, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, मधुमक्षिका पालन, कृषी क्षेत्रात आयात निर्यातीमधील संधी व संस्थांच्या गरजेनुसार प्रशिक्षणाची संरचना करण्यात येते.

**विषय (Topics):**

- शेडनेट व पॉलिहाऊस तंत्रज्ञान
- सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग,
- कृषीमाल आयात व निर्यात प्रशिक्षण
- नर्सरी तंत्रज्ञान
- कमर्शियल हायड्रोपोनिक शेती
- हळद व आले उत्पादन तंत्रज्ञान
- आधुनिक दुग्ध व्यवसाय
- शेतकरी उत्पादक कंपनी- संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशिक्षण
- कृषी व्यवसाय स्टार्टअप प्रशिक्षण कार्यक्रम
- कृषी पर्यटन, मत्स्यपालन, फळे व भाजीपाला उत्पादन करीता उत्तम कृषी पद्धती प्रशिक्षण
- कृषी उत्पादनांचे काढणीपश्चात तंत्रज्ञान
- फळे व भाजीपाला निर्जलीकरण प्रशिक्षण
- गृहनिर्माण सहकारी संस्था, सहकारी बँका, उद्देशीय सहकारी संस्था
- गृहनिर्माण सहकारी संस्था, सहकारी बँका, उद्देशीय सहकारी संस्था प्रशिक्षण

नाविन्यपूर्ण प्रशिक्षण - ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी खालील विषयाचे प्रशिक्षण सुरु केलेले आहे.

निर्जलीकरण (डीहायड्रेशन), हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान, केशर लागवड,ड्रोन तंत्रज्ञान, पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर, वॉटरप्रूफिंग उत्तम तंत्रशुद्ध पद्धती इत्यादी विषयांवर प्रशिक्षणार्थीकडून शुल्क आकारून प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करण्यात आलेली आहे.

**मानांकने (Achievements) :**

- शासनाकडून MCDC ला सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत राज्यस्तरीय शिखर प्रशिक्षण संस्था म्हणुन मान्यता.

- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) अंतर्गत राज्यामध्ये सर्वात जास्त, दर्जेदार व प्रभावी पद्धतीने प्रशिक्षण देणारी संस्था म्हणुन कृषी विभागाचे प्रशस्ती पत्र.
- कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था म्हणून मान्यता.
- महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (MAGNET) अंतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) म्हणून मान्यता.
- एमसीडीसीला केंद्र शासन पुरस्कृत भारतीय कृषी कौशल्य परिषद (ASCI) यांचे Accreditation and Affiliation मिळालेले आहे.
- शेतकरी उत्पादक कंपनीसाठी नाबार्ड पुरस्कृत Producers Organization Promoting Institute (POPI) व Resource Support Agency (RSA) म्हणुन मान्यता प्राप्त.

नाबार्ड, कृषि विभाग, सारथी,मॅग्नेट अशा इतर राज्यस्तरीय संस्था व सुमारे 135 स्वयंसेवी संस्थांसाठीअधिकृत प्रशिक्षण संस्था म्हणुन कामकाज

## प्रशिक्षणाचे शुल्क -

- राज्यातील 45 कृषी विज्ञान केंद्र निवासी प्रशिक्षणासाठी सलग्न आहे.
- प्रशिक्षण कालावधी- 03 ते 05 दिवस निवासी
- प्रशिक्षण कालावधी व शुल्क सर्व करासह - 01 दिवस रु.1500/-( अनिवासी)<br>02 दिवस रु.2950/- (निवासी)<br>03 दिवस रु.7080/- (निवासी)<br>05 दिवस रु.10003/- (निवासी)
- प्रशिक्षण शुल्कामध्ये समाविष्ट बाबी- प्रशिक्षण साहित्य, प्रमाणपत्र, चहा, नाश्ता, भोजन, निवास व्यवस्था व क्षेत्रीय भेट